**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये गौण खनिजाच्या अनुषंगाने दंडात्मक कारवाई करताना गा.न.नं. ७/१२ वर बोजा चढविताना घ्यावयाची दक्षतेबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.विसआ-४५९/०५२६/प्र.क्र.१३१/ख-२/ई-१६५८६२९**
**पहिल मजला, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक :- २५ मे, २०२६.**

**वाचा** :१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६
२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
३. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८

**प्रस्तावना :-**

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये श्री.नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य “गौण खनिज उत्खननाबाबत स्वामित्वधनाच्या पावत्या सांभाळून ठेवण्याबाबत” या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित करण्यात आलेली लक्षवेधी सुचना क्रमांक २१४३ उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने सभागृहात दिनांक १७.०३.२०२५ रोजी चर्चा झाली. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेची सभागृहात चर्चा करण्यात आली असता, तत्कालिन मा.मंत्री (महसूल) यांनी उक्तप्रमाणे आश्वासन दिले आहे. त्याची विधानसभा सदस्य यांनी स्वामित्वधन पावती किती कालावधीसाठी स्वत:जवळ ठेवणे आवश्यक ही कायद्यात तरतूद नाही अथवा अवैध गौण खनिजाचे उत्खनन/भराव या अनुषंगाने सर्वे नंबर किंवा हिस्सा नंबर उपलब्ध करुन त्याची खात्री न करता तहसिलदार अंदाजित जागेसाठी नोटीस बजविण्यात येत असणे, गैाण खनिजाचा भराव एका ठिकाणी असताना सरसकट सर्व हिस्सेदार यांना नोटीस देण्यात येवून त्याचा बोजा एकाच फेरफारव्दारे सात बाऱ्यावर बोजा चढविण्यात येत आहे. त्यामुळे तो बोजा कोणाशी संबंधित हे स्पष्ट होत नाही. अशा प्रकारे दंडाच्या नोटीस पाठवून होणाऱ्या त्रासातून सुटका होण्यासाठी कोणत्या प्रकारची कार्यवाही करणार असल्याच्या मुद्यावर विधानसभा सदस्य यांनी विचारलेल्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी “असा एकत्रित शासन निर्णय किंवा परिपत्रक निर्गमित करण्यात येईल” असे अश्वासन देण्यात आलेले आहे. मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या आवश्वानाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रीय यंत्रणेस सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने क्षेत्रीय यंत्रणेस शासन याव्दारे पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ अन्वये दंडात्मक कारवाई तसेच गा.नं.न. ७/१२ वर बोजा चढवताना घ्यावयाची दक्षता याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

i) अवैध गौण खनिज उत्खनन अथवा त्याचा भराव याबाबत तलाठी मंडळ अधिकारी/तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांनी पंचनामा करताना ज्या क्षेत्रावर अशा प्रकारची बाब आढळून आल्यास सदर ग.नं.७/१२ मध्ये असलेल्या सह हिस्सेदार यांच्या कोणाच्या मालकीच्या क्षेत्रावर आहे याची पंचनाम करतानी खात्री करण्यात यावी व त्यानुषंगाने पंचनाम्याची कार्यवाही करण्यात यावी, असा पंचनामा करताना संबंधित क्षेत्राच्या मालक यांच्या व पंचांच्या उपस्थितीत संबधित अधिकारी/कर्मचारी यांनी पंचनामा करावा.

ii) असा पंचनामा संबंधित तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार संबंधित तहसिलदार/उपविभागीय अधिकारी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून पंचनाम्याच्या वस्तुस्थितीची खात्री करावी.

iii) अशा प्रकरणी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी पंचनाम्याच्या प्रती संबंधिताना देऊन त्यानुषंगाने त्याची बाजू मांडण्याची योग्य ती संधी देण्यात यावी. तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील नियम ७८ अन्वये रॉयल्टी भरल्याची पावती एक वर्षापर्यंत जपुन ठेवलेल्यय असल्यास त्याची खात्री करण्याची कार्यवाही करण्यात यावी व एक वर्षापेक्षा अधीकचा काळ झाल्याने, त्या उपलब्ध नाही असे लेखी हमीपत्र दिल्यास संबंधित अधिकारी यांनी संबंधित व्यक्तीने आवश्यक ती परवानगी घेतली आहे किंवा कसे याची कार्यालयीन अभिलेखाची संपूर्ण खात्री करण्यात येवूनच कार्यवाही करण्यात यावी.

iv) संबंधित तहसिलदार यांनी अवैध गौण खनिजाच्या प्रकरणी दंडात्मक कार्यवाहीचे आदेश पारित करतेवेळी संबंधित प्रकरणी करण्यात आलेल्या पंचनाम्याच्या अनुषंगाने प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवून योग्य ते निष्कर्ष नोंदविण्यात येवून आदेश पारित करावेत अथवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करताना पंचनाम्याच्या अनुषंगाने प्रस्तावात याबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदवून संबंधित तहसिलदार यांनी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी.

v) अशा पंचनामाच्या आधारे गर.न.न. ७/१२ मध्ये नमूद सर्व सहहिस्सेदार यांना दंडात्मक कार्यवाही नोटीस न देता ज्या व्यक्तीच्या मालकीच्या क्षेत्रावर अशी घटना घडलेली आहे. त्यासंबंधित व्यक्तीस दंडात्मक करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

vi) संबंधित व्यक्तीने दंडात्मक रक्कम न भरल्यास त्याचा गा.नं. न.७/१२ वर बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यात येते. अशी बोजा चढविण्याची कार्यवाही करताना गा.नं. ७/१२ मध्ये नमूद असलेल्या सह हिस्सेदार यापैकी कोणाच्या मालकीच्या क्षेत्रावर अवैध उत्खनन किंवा भराव असल्याचे दिसून आलेले आहे. अशा व्यक्तीच्या स्पष्ट नावाने बोजा चढविण्याची कार्यवाही करावी.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्याचा संकेतांक २०२६०५२५१७५९१११९१९ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.05.25 18:00:49 +05'30'

**(सदानंद गो.मोहिते)**
**कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
६. मा. विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
७. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
९. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. सर्व मंत्रालयीन विभाग

१३. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक
१४. सर्व उपविभागीय अधिकारी
१५. सर्व तहसिलदार
१६. निवडनस्ती (ख-२ कार्यासन)